परिवहन समितीच्या सभा, बुधवार दि. ०६/०२/२०१९ रोजी दुपारी ०३:०० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

**उपस्थित सदस्य**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे | सभापती |
| 2 | मा. सौ. विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 3 | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 4 | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 5 | मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 6 | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 7 | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |

**अनुपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 2 | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 3 | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| 4 | मा. श्री. प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 5 | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 6 | **मा. श्री. विरेन्द्र घनश्यामदास कुकरेजा<br>सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य** | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | **श्री. शिवाजी जगताप** | परिवहन व्यवस्थापक |
| 2 | **श्री. हरिश दुबे** | निगम सचिव |

मा.सभापती, परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक ३५** :— परिवहन विभाग, मनपा चे आर्थिक वर्ष २०१८—१९ मध्ये मनपा निधीतून रु. १०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूर च्या Current Account मध्ये सुरूवातीची शिल्ल्क सह माहे ऑक्टोंबर २०१८ रू. ५,०७,३७,५४३/—तिकीट विक्री चा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी ऑक्टोंबर २०१८एकूण रु.५,४७,५०,०९३/—हा विविध लेखा शिर्षाअंतर्गत खर्च झाला आहे.
या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक ३६** :— परिवहन विभाग, मनपा चे आर्थिक वर्ष २०१८—१९ मध्ये मनपा निधीतून रु. १०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूरच्या Current Account मध्ये सुरूवातीची शिल्लक सह माहे नोव्हेंबर २०१८ रू. **४,५२,९२,७१४/—** तिकीट विक्री चा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी नोव्हेंबर २०१८ एकूण रु. २१,**४७,३१,९९७**/—हा विविध लेखाशिर्षा अंतर्गत खर्च झाला आहे.
या खर्चा चा लेखाजोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक ३७** :— शासन निणर्य क्र. संकिर्ण—२७१५/प्र.क्र. १००/१३, दि. १७/१२/२०१६ अन्वये श्रीमती. संध्या ठोंबरे, स्टेनोग्राफर यांची नेमणुक दि. ०१/०९/२०१७ पासुन करण्यात आली असून उक्त शासन निर्णयानुसार यांना मासिक परिश्रमिक रू. ३३,०८६/— मंजुर मानधन देण्याबाबत प्रश्न समितीने विचारात घेवून शासन निर्णयाप्रमाणे यांची नेमणुक करतावेळी जे बेसिक आहे त्यानुसार जे मानधन निघेल तेच देय असुन इतर वाढीव भत्ते ग्राहय धरता येणार नाही. या लेखाधिकारी यांनी केलेल्या सुचनेनुसार शासन निर्णयानुसार कोणत्याही प्रकारचे मानधनात वाढ होणार नाही, तसेच मा. सभापती यांनी मागील परिवहन समिती च्या दि. १७/१०/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत ठराव क्र. २४ नुसार शासन निर्णयाप्रमाणे जे वेतन अनुज्ञेय राहील त्यास कमाल रु ४०,०००/— प्रत्येकी मासिक मानधन मर्यादा ठेऊन वरील स्टेनोग्राफर यांना रु २०,०००/— एकमुस्त मासिक मानधन देण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक ३८** :— शासन निणर्य क्र. संकिर्ण—२७१५/प्र.क्र. १००/१३, दि. १७/१२/२०१६ अन्वये श्री. केदार आर मिश्रा, उप—अभियंता (स्थापत्य) यांची नेमणुक दि. ०१/०९/२०१७ पासुन करण्यात आली असून उक्त शासन निर्णयानुसार यांना मासिक परिश्रमिक रू. ५३,३०६/— मंजुर मानधन देण्याबाबत प्रश्न शासन निर्णयाप्रमाणे यांची नेमणुक करतावेळी जे बेसिक आहे त्यानुसार जे मानधन निघेल तेच देय असुन इतर वाढीव भत्ते ग्राहय धरता येणार नाही. या लेखाधिकारी यांनी केलेल्या सुचनेनुसार शासन निर्णयानुसार कोणत्याही प्रकारचे मानधनात वाढ होणार नाही, तसेच मा. सभापती यांनी मागील परिवहन समिती च्या दि. १७/१०/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत ठराव क्र. २४ नुसार शासन निर्णयाप्रमाणे जे वेतन अनुज्ञेय राहील त्यास कमाल रु ४०,०००/— प्रत्येकी मासिक मानधन मर्यादा ठेऊन एकमुस्त मासिक मानधन देण्यात यावा या मा.सभापती यांनी केलेल्या सुचनेस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक ३९** :— अपंग नागरिकांना रेड शहर बस मध्ये निशुल्क प्रवास उपलब्ध करून देण्याबाबत मा. उपायुक्त (समाज कल्याण विभाग) मनपा, नागपूर यांचे पत्र क्र. ४५६/सकवि/२०१८ दि. २०/१०/२०१८ परिवहन विभाग, मनपा, नागपूर यांना प्राप्त झाले. सदर पत्रात मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य महाराष्ट्र राज्य

यांनी दि. १९/१०/२०१८ रोजी आयोजित बैठकीत नागपूर शहर रेड बस मध्ये अंपग नागरिकांना निशुल्क प्रवास उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश दिलेले आहे.

मा. उपायुक्त (समाज कल्याण विभाग) मनपा, नागपूर यांचे (पान क्र. ०८) शेऱ्याप्रमाणे नागपूर शहर रेड बस प्रवासात अंपग नागरिक व अंपगत्वाचे प्रमाण जास्त असल्यास त्यांची सोबत प्रवास करणारे व्यक्तींना निशुल्क प्रवासामध्ये येणाऱ्यास खर्चाची प्रतिपुर्ती अंपगासाठी राखीव शिर्षाअंतर्गत समाज कल्याण विभाग, मनपा, नागपूर मार्फत परिवहन विभाग, मनपा, नागपूर यांना करण्यात येईल. असे उल्लेखीत आहे.

सध्या नागपूर शहर रेड बस मध्ये अंपग नागरिकांना ७५ टक्के सवलत व अंपगत्वाचे प्रमाण जास्त असल्यास अंपग नागरिक सोबत प्रवास करणारे व्यक्तींना ५० टक्के सवलत देण्यात येत आहे. मा. उपायुक्त (समाज कल्याण विभाग) मनपा, नागपूर यांचे उपरोक्त नमुद पत्र व (पान क्र. ०८) शेऱ्याप्रमाणे अंपग नागरिक व त्यांच्या सोबत असलेले व्यक्तींना निशुल्क प्रवास भाडे ची ही रक्कम प्रतिमाह मे. डिम्टस् ऑपरेटर (आय.बी.टी.एम.) द्वारे प्राप्त विवरण अंकेक्षणानंतर समाज कल्याण विभाग, मनपा, नागपूर यांना प्रतिपुर्ती करीता सादर करण्यात येईल.

सदर प्रस्तावास मा. आयुक्त, मनपा यांची मंजुरी प्राप्त झाली असल्याने हया बाबींचा विचार करून नागपूर शहर रेड बस मध्ये निशुल्क प्रवास बाबतचे प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक ४०</u> :— नागपूर महानगरपालिकेची शहर बस वाहतुक सेवा यापुर्वी मे. व्ही.एन.आय.एल.यांचेद्वारे ‘‘एन.सी.सी.’’ तत्वावर राबविण्यात येत होती. महानगरपालिकेला होत असलेल्या सतत तोटयामुळे ही शहर बस सेवा मनपाने ‘‘जी.सी. सी. तत्वावर राबविण्यात यावी या बहुमताने झालेल्या निर्णयानुसार महानगरपालिकेने ही सेवा नविन ०३ कंत्राटदार मे. आर.के. सिटी बस सर्व्हीसेस, मे. ट्रॅव्हल टाईम सिटी बस सर्व्हीसेस व मे. हंसा सिटी बस सर्व्हीसेस यांचे द्वारे राबविण्याचे ठरविले. यास्तव सर्वप्रथम दि. ०५/१२/२०१६ पासुन प्रत्येक ऑपरेटर द्वारे ०५ बसेस यानुसार नविन मिडी बसेस द्वारे ही सेवा प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आली आणि दि. ०१/०३/२०१७ पासुन पुर्णत: स्विकारण्यात आली. ही सेवा सुचारू व सुरळीत पणे सुरू राहण्याकरीता मनपाने या तिनही ऑपरेटरसोबत करारनामा करून आवश्यक त्या अटी व शर्तींचा अगीकार करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने शहर बस डेपोकरीता जागा देणे, डेपोकरीता सुरक्षा भिंत व डेपोच्या जागेचे बळकटीकरण करणे व इस्क्रो खाते उघडणे या अटी आहेत. करारनामा कर्तेवेळी यांचे वाचन करून स्वाक्षरी करते वेळी तिनही ऑपरेटर यांना प्रकल्पाच्या सुरूवातीची स्थिती तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीची संपुर्णपणे माहिती होती.

शहर बस सेवा सुरळीत चालण्याकरीता दुसरे महत्वाचे घटक म्हणजे वाहक व चालक आहे. या संपुर्ण व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्याकरीता प्राधिकारीनीचे मंजुरीने वाहक पुरवठा करणारी ऐजन्सी मे. युनिटी सेक्युरेटी सर्व्हीसेस, नागपूर व मे. एस.आय.एस. सेक्युरेटी सर्व्हीसेस, नागपूर आणि आय.बी.टी.एम. (डिम्टस्) यांच्या संयुक्त रित्या विधीवत नियुक्त्या करण्यात आल्यात.

शहर बस सेवेमध्ये डेपोच्या सुरक्षा भिंत व डेपोच्या जागेचे बळकटीकरणामुळे, वाहक पुरवठा करणाऱ्या ऐजन्सी द्वारे दैनंदिन आवश्यक असलेला वाहक वर्ग पुरवठा होत नसल्यामुळे, बसेस अस्वच्छ व नादुरूस्त असल्यामुळे आणि ठरलेल्या मानकाप्रमाणे दैनंदिन प्रवासी वर्ग डिम्टस् द्वारे उपलब्ध होण्याचे प्रयत्न होत नसल्यामुळे तिनही ऑपरेटर, वाहक पुरवठा करणाऱ्या एजेन्सी व मे. डिम्टस् यांचेवर नियमाप्रमाणे दंड आकारण्यात आलेला आहे.

तसेच काही वाहक कार्यावर असतांना विविध कारणस्तव काही प्रवाश्यांची तिकीट न काढता किंवा कमी पैसे घेवून त्यांना प्रवास करवित असल्यामुळे, अचानक तपासणी पथकाद्वारे बसेसची तपासणी होवून बिना तिकीट प्रवासी आढळल्यास संबंधीत वाहकांची आय.डी. बंद करण्यात येते. नोव्हेंबर २०१७ मध्ये झालेल्या एस.ओ.पी. नुसार वाहकांची कार्यशैली, कार्यपध्दती व संहीता तयार करण्यात आली असून याद्वारे प्रथम ५ प्रवासी बिना तिकीट आढळल्यास बंद करण्यात आलेल्या संबधीत वाहकाची आय.डी. मे. डिम्टस् यांना दिलेल्या अधिकानुसार/करारानुसार एक संधी देवुन त्यांचेद्वारे उघडण्यात येते. परंतु यापुढील बिना तिकीट प्रवाशी व रूपये ४००/— व त्यापैक्षा कमी/जास्त रक्कम वाहकाकडे आढळल्याच्या घटनांची चौकशी दरम्यान संबधीत वाहक दोषी आढल्यास त्यांची आय.डी उघडण्यात येत नाही. परंतु एस.ओ.पी. च्या कलम क्र. ३.४ नुसार असलेल्या अधिकारान्वये मनपाने विभागातील ०३ अधिकारी व आर.टी.एल. (डिम्टस्) यांची समिती बनवुन अशा प्रकरणांची चौकशी करून निर्णय घेण्यास सुचविले. परंतु मा. आयुक्त यांनी दि. २६/०६/२०१८ ला घेतलेल्या सभेमध्ये निर्देशित केले की अशा प्रकराची सर्व प्रकरणे अपर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समिती पुढे उचित निर्णयास्तव सादर करण्यात यावी.

यानुसार दि. ०५/११/२०१८ रोजी सकाळी ११:०० वा. झालेल्या स्टेरिंग कमेटीच्या सभेमध्ये प्रस्तुत मुद्दे उपस्थित केले असून यावर मा. आयुक्त यांनी सदर्हु प्रकरण व वरील दंड आकारण्या संबधातील सर्व प्रकरणे मा. परिवहन समिती यांचे समक्ष सादर करण्याचे निर्देशित केले असल्यामुळे सदर्हु विषयाचे प्रारूपावर योग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून यावर समितीने असे सुचविले कि एक विना तिकीट ते पाच विना तिकीट अशा दोषी वाहकास प्रत्येकी (१ विना तिकीट)याप्रमाणे १००० रूपये दंड आकारून अशाप्रकारे पाच विना तिकीट दोषी वाहक आढळल्यास ५००० रूपये दंड आकारण्यात येवून ही संधी एका वाहकास फक्त दोनदा देता येईल. पुन्हा तोच वाहक दोषी आढळल्यास तिस—यांदा संधी आय.डी. उघडण्याबाबत संधी देण्यात येणार नाही असा निर्णय घेण्यात आला. तिन डिझेल बस ऑपरेटर, दोन वाहक पुरवठा करणाऱ्या एजंसी आणि प्रकल्प व्यवस्थापक मे. डिम्स् यांचेशी संबंधीत आकारण्यात येणारा दंड या विषयावर सुधारित प्रारूप विभागाद्वारे अभ्यास करून पुढच्या समिती समक्ष ठेवण्यात यावा या मा.सभापती यांनी केलेल्या सुचनेस समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ४१</u>** :— परिवहन विभाग, मनपा चे आर्थिक वर्ष २०१८—१९ मध्ये मनपा निधीतून रु. १०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूरच्या Current Account मध्ये सुरूवातीची शिल्लक सह माहे डिसेंबर २०१८ रू. ७,३१,१३,४२६/—

तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी डिसेंबर २०१८ एकूण रु.१३,८४,५५,५६८/— हा विविध लेखा शिर्षाअंतर्गत खर्च झाला आहे.
या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक ४२** :— मनपा परिवहन विभागाचा स्वतंत्र आकृतीबंध शासनाच्या मान्यतेस्तव पाठविण्यात आला आहे. आस्थापना पदनिर्मिती प्रक्रियेत लागणारा कालावधी तसेच सध्या विभागाच्या कामामध्ये झालेली प्रचंड वाढ लक्षात घेता व परिवहन विभागाकडे पुरेसा अधिकारी व कर्मचारी वर्ग नसल्याने खालील नमुद सेवानिवृत्त अधिकारी व तथा इतर अनुभवी कर्मचारी यांच्या तंज्ञ सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबत शासन निणर्य क्र. संकीर्ण—२७१५/प्र.क्र. १००/१३ मंत्रालय, मुंबई. दिनांक १७ डिसेंबर २०१६ नुसार सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दिशानिर्देश व महाराष्ट्र महानगरपालिका १९४९ चे कलम ३४८ अन्वये परिवहन व्यवस्थापक व ३४९ अन्वये मा. परिवहन समिती यांचे विविध अधिकाराअंतर्गत तज्ञ सेवानिवृत्त अधिकारी व तथा इतर अनुभवी कर्मचारी यांना विवक्षित कामासाठी निर्धारित मानधनावर करार पध्दतीने नियुक्ती देण्यासंदर्भात खालील पदांच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचेनांव | वयोमर्यादा | पद संख्या | शैक्षणिकपात्रता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १) | वाहतूक व्यवस्थापक | ६५—७० वर्षे पेक्षा अधिक नसावी | १ | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळच्या सेवेतुन सेवा निवृत्त अधिकारी वर्ग (१) आणि वाहतूक व्यवस्थापक पदाचा प्रत्यक्ष कामाचा १० वर्षाचा अनुभव. |
| २) | श्रम तथा जनसंपर्क अधिकारी | ६५ वर्षे पेक्षाअधिक नसावी | १ | शासकीय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेतील सेवानिवृत्त अधिकारी वर्ग (१) आणि परीवहन विभागातिल प्रत्यक्ष कामाचा अनुभव. |
| ३) | लेखाधिकारी | ६५ वर्षे पेक्षाअधिक नसावी | १ | वित्त व लेखा सेवा प्रवर्गातिल सेवानिवृत्त आणि स्थानिक स्वराज्य संस्थेतील परीवहन विभागातिल प्रत्यक्ष कामाचा २ वर्षाचा अनुभव. |
| ४) | मूख्य मार्गतपासनीक | ६५ वर्षे पेक्षाअधिक नसावी | २ | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळतुन सेवानिवृत्त मार्गतपासनीक पदाचा प्रत्यक्ष कामाचा १० वर्षाचा अनुभव. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५) | सहा: लेखापाल | ४० वर्षे पेक्षाअधिक नसावी | १ | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची परीक्षा उत्तीर्ण. आणि, स्थानिक स्वराज्य संस्थेतील परीवहन विभागातिल लेखाशाखेतील प्रत्यक्ष कामाचा १ वर्षाचा व खाजगी कार्यालयातील ५ वर्षाचा अनुभव. एम.एस.सी.आय.टी. संगणक ज्ञान आवश्यक |
| ६) | पर्यवेक्षक (अतांत्रिक) | ६५ वर्षे पेक्षा अधिक नसावी | २ | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळतुन सेवानिवृत्त अधिकारी व पदावर म.रा.म.प.म. मध्ये या पदावरील काम करण्याचा प्रत्यक्ष अनुभव. |
| ७) | सहा: मार्गतपासनीक | ४० वर्षे पेक्षा अधिक नसावी | ०८ | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची परीक्षा उत्तीर्ण. प्रत्यक्ष कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| ८) | वाहनचालक | ४० वर्षे पेक्षाअधिकनसावी | २ | इयत्ता १० वी परिक्षा उत्तीर्ण आणि, १) हलके व जड वाहनचालविण्याचा परवाना. २) परवाना मिळाल्यानंतर वाहनचालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव. ३) मराठी, लिहीता बोलता व वाचता येणे आवश्यक ४) वाहन दूरूस्ती व देखभालीचे कामासंबंधी प्रशिक्षणाचे मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्थेचे प्रमाणपत्र धारणकरणाऱ्यास प्राधान्य. |

याकरीता वरील नमुद पदे शासन निर्णयानुसार व निर्धारित मानधनावर निवड प्रक्रिया व जाहीरातीद्वारे नियुक्तीच्या प्रस्तावास परिवहन समिती समक्ष ठेवण्यात येऊन समितीची मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून शहर बस वाहतुक अंतर्गत ३४० बसेसच्या ४७०० फे—या लक्षात घेता बस तपासणीपथक तयार करण्याच्या अनुषंगाने मुख्य मार्गतपासनीक २ पदाऐवजी ४ पदे, सहा: मार्गतपासनीक ८ ऐवजी १६ पदे करण्यात यावे व पोलीस वाहतुक विभागातून सेवानिवृत्त झालेले पोलीस निरीक्षक किंवा त्या वरच्या पदावरील असलेले अधिकारी पोलीस विभागाशी सर्व संबंधित कागदपत्रे व व्यवहार करण्याकरिता तत्सम एका अधिका—याची नियुक्ती करावी. या मा.सभापती यांनी केलेल्या सुचनेसह या विषयास समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक ४३** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
परिवहन समिती
महानगरपालिका,नागपूर